# ऋतुरंगमध्ये रुईयाची बाजी

**अभिषेक तेली**, मुंबई विद्यापीठ
muntainbox@gmail.com




तरुणांमध्ये मराठी भाषेची गोडी रुजावी या हेतूने माटुंगा येथील **पोदार कॉलेज**मध्ये अभिनव उपक्रम राबवण्यात आला. 'वारसा माय मराठीचा, साज संस्कृतीचा' या संकल्पनेवर आधारित कॉलेजच्या मुद्रा मराठी वाङ्मय मंडळातर्फे 'ऋतुरंग' या फेस्टिव्हलचं आयोजन करण्यात आलं होतं. झूम ॲपच्या माध्यमातून व्हर्च्युअल पद्धतीनं फेस्ट पार पडला. या फेस्टचा 'महाराष्ट्र टाइम्स' मीडिया पार्टनर होता.

फेस्टमध्ये महाराष्ट्राच्या संस्कृतीचा प्रसार करण्याच्या दृष्टीनं प्रयत्न केले गेले. शिक्षण, औद्योगिक, सांस्कृतिक, राजकारण, क्रीडा, सिनेसृष्टी यासारख्या महाराष्ट्राशी निगडित क्षेत्रांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी या उद्देशाने टीम ऋतुरंगने फेस्टचं आयोजन केलं होतं. या अंतर्गत फेस्टच्या टीमने गेला दीड महिना 'podar_hruturang' या इन्स्टाग्राम अकाऊंटवरून विविध उपक्रमसुद्धा राबवले. ऋतुरंगमधील विविध स्पर्धांमध्ये माटुंगा येथील रुईया कॉलेजने बाजी मारली. अनेक पारितोषिकं जिंकत आणि सर्वाधिक गुणांची कमाई करत रुईयाने ऋतुरंगच्या विजेतेपदावर नाव कोरलं.

## मुख्य निकाल

**सर्वोत्कृष्ट कॉलेज**

**प्रथम- रुईया कॉलेज**
**द्वितीय- के. सी. कॉलेज**
**तृतीय- झेविअर्स कॉलेज**

सध्याच्या सोशल मीडिया आणि स्मार्टफोनच्या जमान्यात पत्रलेखनाचं प्रमाण कमी झालंय. हेच जाणून ऋतुरंगमध्ये 'पत्रास कारण की' ही स्पर्धा घेण्यात आली. यात विद्यार्थ्यांना महाराष्ट्रासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींना पत्र लिहून त्याचं वाचन करायचं होतं. विद्यार्थ्यांनी आपल्या लेखनकौशल्यानं छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, सावित्रीबाई फुले, पु. ल. देशपांडे, बाळासाहेब ठाकरे इ. व्यक्तींना पत्र लिहीलं. तर संयुक्त महाराष्ट्र चळवळीवर आधारित पत्र लिहून भावनांना वाट मोकळी करत देत त्याचं वाचन केलं. निनाद कदम याने या स्पर्धेचं परीक्षण केलं.

**महाराष्ट्र टाइम्स**
**मीडिया पार्टनर**

'नृत्यलंकार' या लावणी स्पर्धेची अंतिम फेरी विविध ठसकेबाज लावण्यांनी रंगली. रुईयाच्या ऋतुजा शिंदेने प्रथम क्रमांक तर रुईयाच्याच पद्मजा ढवळेने द्वितीय क्रमांक पटकावला. तर निर्मला मेमोरियल फाऊंडेशन कॉलेजच्या कुणाल नाईक या मुलाने लावणी सादर करत तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेचं परीक्षण सुप्रसिद्ध लावणीसम्राज्ञी मंगला बनसोडे आणि त्यांच्यासोबत रुचिरा येरपळेने केलं. महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आविष्कार कॅमेरात कैद करत 'फोटोग्राफी', एकाच रागातील तीन गाणी समूह पद्धतीनं सादर करत 'स्वरगंध' आणि महाराष्ट्राशी निगडित विविध प्रश्नांचा वेध घेत 'रणांगण' स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तर स्वतःमधील विविध कौशल्यं सादर करत 'मिस्टर अँड मिस ऋतुरंग' ही स्पर्धा रंगली.

## नृत्यनाट्य रंगलं!

एका स्पर्धेत रामायण-महाभारतातील प्रसंग स्पर्धकांना शास्त्रीय नृत्याच्या माध्यमातून सादर करायचे होते. या स्पर्धेमध्ये रुईयाच्या तन्वी कदमने प्रथम क्रमांक तर रुईयाच्याच श्रेया रेगेने रामायणातील प्रसंग सादर करुन द्वितीय क्रमांक पटकवला. साक्षी वैद्य आणि जान्हवी अंकम या दोघांनी तृतीय क्रमांकावर नाव कोरलं. 'नृत्यनाट्य' या शास्त्रीय नृत्य स्पर्धेच्या अंतिम फेरीचं परीक्षण सानिका पुरोहित-प्रभू आणि निकिता बनवलीकर तर प्राथमिक फेरीचं हर्षिता हाटे यांनी केलं.